| MHKO100011382020 | **नियमित दिवाणी दावा क्र. ९४/२०२०**<br>**आदेश निशाणी क्र. ३९**<br>**(सौ.रोमा व्यंकोजी शिंदे वगैरे विरुध्द श्री. संभाजी केरबा देसाई वगैरे )** |
|---|---|

प्रतिवादी क्र. १ व २ (अ)(ब) यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत चौकशी" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी १ व २ (अ)(ब) यांचा अर्ज व त्यावर वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**३.** प्रतिवादी १ व २ (अ)(ब) यांचे असे कथन आहे की, दावा कोवीड-१९ च्या काळात दाखल केल्याने या कामाची आवश्यक ती माहिती व कागदपत्रे वेळीच उपलब्ध झाली नाहीत. इतकेच नव्हेतर वादीने देखील दावे सोबत जोडलेली संपूर्ण कागदपत्रे प्रतिवादी यांना दिलेली नाहीत. त्याबाबत प्रतिवादी यांनी तक्रार अर्ज कोर्टात दिलेला आहे त्यामुळे कैफीयत देणेस विलंब झालेला आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारीत करावेत अशी विनंती केली आहे.

**५.** वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द हक्कज्ञापन, कब्जा व कायम मनाई ताकीद होणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक ०५/०२/२०२१ रोजी प्रतिवादी यांचे विरुध्द विना कैफीयत आदेश पारीत झाला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज व सोबत कैफीयत दिनांक ०५/०३/२०२१ रोजी दिलेला आहे. प्रतिवादी १ व २ (अ)(ब) यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. परंतु प्रतिवादी यांनी आपल्या अर्जात वादी यांनी समन्ससोबत दाव्याची आवश्यक कागदपत्रे दिली नसल्यामुळे कैफीयत वेळेत देता आली नाही अशी हरकत उपस्थित केली आहे. याबाबत वादी यांनी प्रतिवादी यांनी घेतलेल्या सदर हरकतीस विरोध दर्शविलेला नाही. अद्याप प्रकरण अंतिम सुनावणीसाठी सुरु झालेले नाही. प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट प्रकरण गुणदोषावर चालणेस मदत होणार आहे. तसेच प्रतिवादी यांनी कैफीयत दाखल करणेस झालेला उशीराबातचे कारण व कोव्हीड-१९ कालावधीत प्रतिवादी यांना कागदपत्रे उपलब्ध

करणेस आलेल्या अडचणींचा विचार करता प्रतिवादींचा अर्ज विनाखर्च मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आ दे श**

**१)** प्रतिवादी क्र. १ व २ (अ)(ब) यांचा निशाणी क्र. ३९ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२)** अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ठ करण्यात येत आहे.
(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०७/१०/२०२१

(श्रीमती एस.एन.निकम)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज